**ePaper** राऊत हे जळणारं लाकूड...गाढवालाही अक्कल पण... नरेश म्हस्के राऊतांवर संतापले



| वर्ष - 8 | अंक - 259 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™




www.mahaenews.com | सोमवार, दि. 14 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## सोन्याच्या किमतीमध्ये तब्बल 38 टक्क्यांनी घसरण होणार

# सोन्याचा भाव कोसळणार!

## तज्ज्ञांच्या मते, सर्वोच्च शिखरावरून सोन्याच्या भावाची घसरगुंडी होईल

। मुंबई / पुणे / बीड । प्रतिनिधी । महाईन्यूज

**सोन्याच्या भाववाढीचा फटका बहुतेक प्रत्येकालाच बसला आहे. गेल्या काही महिन्यांपासून सोन्याच्या किमती झपाट्याने वाढल्या असून, सध्या सोने ९५ हजार रुपयांच्या आसपास पोहोचले आहे. लग्नसराईसाठी किंवा दागिने खरेदी करणाऱ्यांसाठी हा दणका असला तरी गुंतवणूकदारांसाठी ती एक मोठी संधी मानली जाते.**





**गुंतवणूक केलेल्यांची भंबेरी : वर्षभरात सोने 60 हजारावर येईल!**

### आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी चर्चा

आता, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेच्या अंदाजानुसार आणि या क्षेत्रातील अर्थतज्ज्ञांच्या मते पुढील वर्षांत सोन्याच्या किमतीत मोठी घसरण होऊ शकते आणि त्याचा थेट फायदा ग्राहकांना मिळू शकतो.

### अडतीस टक्क्यापर्यंत

### घसरण शक्य ?

'मनी कंट्रोल' ने दिलेल्या माहितीनुसार, 'अमेरिकन फायनान्शिअल सर्व्हिसेस फर्म मॉर्निंग स्टार' चे विश्लेषक जॉन मिल्स यांच्या मते, जागतिक बाजारात सोन्याची किंमत 1,820 अमेरिकन डॉलर्स प्रति औंसपर्यंत खाली येऊ शकते. सध्याच्या 3,080 डॉलर प्रति औंसच्या तुलनेत ही मोठी घसरण ठरेल. जर ही शक्यता खरी ठरली, तर भारतातही सोन्याचे दर 55 ते 60 हजार रुपये प्रति दहा ग्रॅमपर्यंत खाली येऊ शकतात.

### दर का वाढत आहेत ?

गेल्या काही महिन्यांत जागतिक अस्थिरता, महागाई आणि अमेरिका-चीन व्यापारयुद्धामुळे गुंतवणूकदारांनी सुरक्षित पर्याय म्हणून सोन्याकडे मोठ्या प्रमाणावर मोर्चा वळवला. त्यामुळे सोन्याच्या किमती वाढल्या. मात्र, हे दर किती काळ टिकतील, यावर तज्ज्ञांमध्ये मतभेद आहेत.

### मोठ्या घसरणीची शक्यता का?

जॉन मिल्स यांनी सोन्याच्या किमतीत संभाव्य घसरणीची काही ठोस कारणे दिली आहेत. पुरवठा वाढत आहे, सोने महाग झाल्यास खाणकाम अधिक वाढते. 2024 मध्ये जगभरात सोन्याच्या उत्पादनात 9 टक्के वाढ झाली. ऑस्ट्रेलियासह अनेक देश उत्पादन वाढवत आहेत आणि जुन्या सोन्याचा मोठ्या प्रमाणावर पुनर्वापर होत आहे.

### सोन्याची मागणी घटण्याचे संकेत..

2024 मध्ये जगभरातील सेंट्रल बँकांनी 1,045 टन सोने खरेदी केले. मात्र, वर्ल्ड गोल्ड काउन्सिलच्या सर्व्हेनुसार, 71 सेंट्रल बँकर्स पुढील वर्षी सोने खरेदी कमी करु शकतात.

### सोन्याचे दर वाढणार की कमी होणार ?

सध्या सोन्याच्या किमती विक्रमी उच्चांकावर आहेत, पण, तज्ज्ञांच्या मतभेदांमुळे ग्राहक आणि गुंतवणूकदार संभ्रमात आहेत. सोन्याच्या किमती 38 टक्क्यांनी खाली जातील, की आणखी उच्चांक गाठतील, हे येत्या काळात स्पष्ट होईल. मात्र, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत ज्या तज्ज्ञांचे अंदाज नेहमीच बरोबर आले आहेत, त्यांच्या म्हणण्यानुसार वर्षभरात सोन्याचा दर हा कोसळेल आणि तो साठ हजारच्या आसपास स्थिर होईल !

# बारामतीसाठी 100 दिवसांत 1100 कोटी!

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मंजूर केलेल्या कामांबाबत माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बारामती : 'बारामती शहर आणि तालुक्यात पिण्याच्या पाण्याच्या योजना केल्या आहेत. त्या सर्व मिळून दीड हजार कोटींच्या असतील. एका आमदाराला वर्षाला पाच कोटी याप्रमाणे पाच वर्षांत २५ कोटी रुपये मिळतात. बारामतीसाठी दीड हजार कोटी रुपये आणले आहेत. जानाई शिरसाई योजनेसाठी ४६० कोटी, पशुसंवर्धन विद्यालयासाठी ५६० कोटी रुपये, अशी जवळपास अकराशे कोटी रुपयांची कामे शंभर दिवसांच्या आत मंजूर केली आहेत,' अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविवारी बारामतीमध्ये दिली.**



बारामती तालुक्यातील बोरकरवाडी येथे टीसीएस फाउंडेशनच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून जानाई शिरसाई उपसा सिंचन योजनेचा उजवा कालवा रायझिंग ते बोरकरवाडी तलावापर्यंत करण्यात आलेल्या जलवाहिनीच्या लोकार्पणाचा कार्यक्रम पवार यांच्या उपस्थितीत पार पडला. त्यांच्या हस्ते जलपूजनही करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

'गरीब वर्गाचे घरांचे स्वप्न पूर्ण करण्याकरिता लवकरच पुणे विभागात ३० हजार घरांचा कार्यक्रम घेतला आहे. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन ते तीन कोटी घरांचा कार्यक्रम घेतला आहे. महाराष्ट्रासाठी २० लाख घरे मंजूर झाली आहेत. त्यापैकी पाच हजार घरे बारामतीसाठी मंजूर झाली आहेत,' असेही पवार यांनी सांगितले.

### 'काकांना विश्वासात घेतल्याशिवाय चालत नाही'

'काकांना विश्वासात घेतल्याशिवाय पुढे काही चालत नाही,' असे वक्तव्य उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. बोरकरवाडीतील कार्यक्रमात अनेक कार्यकर्त्यांनी निवेदने दिली. त्याचा उल्लेख करतानाच समोर बसलेले काका कुतवळ त्यांच्याकडे पाहत म्हणाले, 'एका रस्त्याच्या कामकाजाबद्दल तुमच्याशी बोललो आहे, अधिकाऱ्यांशी बोललो आहे. त्यांना मी सांगितले आहे, की काकांना विश्वासात घ्या.' एवढे बोलून अजित पवार काही क्षण थांबले आणि पुढे म्हणाले, 'अहो, काकांना विश्वासात घेतल्याशिवाय पुढे काही चालत नाही बाबा!' त्यांच्या या विधानावर उपस्थितांनी हसून दाद दिली. त्यावर, लगेचच, 'मी काका कुतवळांबद्दल बोलतो आहे, नाही तर लगेचच तुम्ही दादा घसरले, असे म्हणाल. पण, दादा घसरलेले नाहीत,' अशी मिश्कील टिप्पणीही त्यांनी केली.v

### सूरज चव्हाणच्या घराच्या बांधकामाची पाहणी

बिग बॉस मराठीचा विजेता सूरज चव्हाण याच्या मूटी येथे नव्याने बांधकाम सुरू असलेल्या घराला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविवारी भेट दिली. 'बिग बॉस'चा विजेता ठरल्यानंतर सूरज महाराष्ट्रभर चर्चेत आला. त्याला घर बांधण्याची इच्छा होती. त्या वेळी त्याला घर बांधून देण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले होते. अजित पवारांनी दिलेले आश्वासन आता पूर्णत्वास येत असून, याबाबतचा आढावा घेण्यासाठी रविवारी पवार यांनी बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणाला भेट दिली.

# डॉक्टरांची सुरक्षा 'रामभरोसे'!

## आयएमए'च्या राष्ट्रीय अध्यक्षांचे स्पष्ट मत; देश पातळीवर कायद्याची मागणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'डॉक्टरवर सकाळी हल्ला करणारा हल्लेखोर संध्याकाळी जामिनावर सुटतो. त्यामुळे डॉक्टरांची सुरक्षा रामभरोसे आहे. डॉक्टरांवरील हल्ले रोखण्यासाठी कठोर कायदे नाहीत. याचबरोबर प्रत्येक राज्यात वेगवेगळे कायदे आहेत. त्यामुळे देश पातळीवर डॉक्टरांच्या संरक्षणासाठी कायदा करावा,' अशी मागणी इंडियन मेडिकल असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. दिलीप भानुशाली यांनी रविवारी केली.**




इंडियन मेडिकल असोसिएशनच्या पुणे शाखेच्या वतीने आयोजित कार्यक्रमासाठी डॉ. भानुशाली पुण्यात आले होते. या वेळी बोलताना ते म्हणाले, 'डॉक्टरांवर हल्ले होण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. या हल्ल्यांमुळे डॉक्टरांच्या संरक्षणाबाबत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी सध्या राज्य पातळीवर कायदे आहेत. देशात २५ राज्यांनी असे कायदे लागू केले असून, महाराष्ट्रातही असा कायदा आहे. पण, हे सर्व कायदे कठोर नसून, डॉक्टरांवरील हल्ला त्यात जामीनपात्र गुन्हा मानण्यात आला आहे. त्यामुळे डॉक्टरांवर सकाळी हल्ला करणारा हल्लेखोर संध्याकाळी जामिनावर सुटतो. त्याला कायद्याचा धाकच राहिलेला नाही.' 'डॉक्टरांच्या संरक्षणासाठी प्रत्येक राज्यात वेगवेगळा कायदा असण्याऐवजी केंद्र सरकारने कायदा करावा. या कायद्यात डॉक्टरांवरील हल्ल्यासाठी किमान सात वर्षांच्या शिक्षेची तरतूद आणि हा गुन्हा अजामीनपात्र करावा. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन आम्ही त्यांच्याकडे म्हणणे मांडले. त्यावर त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. सरकार डॉक्टरांच्या मागण्यांकडे गांभीर्याने पाहत असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. त्यामुळे लवकरच केंद्र सरकार यासंबंधी कायदा करेल, अशी आशा आहे,' असे डॉ. भानुशाली यांनी सांगितले.

### 'देशात मिश्रपॅथी नको'

'केंद्र सरकारकडून सध्या मिश्रपॅथीला प्राधान्य दिले जात आहे. याबाबतचे काही प्रस्ताव सरकारच्या पातळीवर आहेत. आयुर्वेदिक डॉक्टरांना ॲलोपॅथीची औषधे देण्यासोबत काही निवडक शस्त्रक्रिया करण्यास परवानगी देण्याचाही प्रस्ताव आहे. सरकारकडून विविध प्रकारच्या वैद्यकीय शाखा एकत्र करण्याची चूक केली जात आहे. त्याचे गंभीर परिणाम संपूर्ण आरोग्य व्यवस्थेवर होणार आहेत. त्यामुळे मिश्रपॅथीचा प्रयोग टाळावा,' असे स्पष्ट मत डॉ. दिलीप भानुशाली यांनी मांडले.

## आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना आर्थिक फटका

# महापौर निधीपासून गरजू रुग्ण वंचित!

### गेल्या तीन वर्षांपासून आर्थिक मदत बंद; महिन्याकाठी 20 मागणी अर्ज

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेतील प्रशासकीय राजवटीमुळे शहरातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना त्याचा आर्थिक फटका बसला आहे. महापौरपद रिक्त असल्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिका सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टकडून त्या रुग्णांना मिळणारी ५ हजार रुपयांची वैद्यकीय मदत गेल्या तीन वर्षांपासून बंद आहे. महापालिका अधिकाऱ्यांकडून तोडगा काढला जात नसल्याने रुग्ण मदतीपासून वंचित आहेत.**





महापालिकेने ४ सप्टेंबर १९९१ ला या ट्रस्टची स्थापना केली. औषधोपचारासाठी अर्थसाह्य करणे, नैसर्गिक आपत्ती, मानवनिर्मित आपत्तीसमयी पीडितांना अर्थसहाय करणे हा मुख्य उद्देश आहे. ट्रस्टच्या माध्यमातून शहरातील गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय उपचारासाठी ५ हजार रुपये मदत केली जाते. धनादेशावर ट्रस्टचे अध्यक्ष म्हणून महापौरांची सही असते. ही रक्कम कमी असली, तरी त्यामुळे गरीब रुग्णांना थोडासा आर्थिक दिलासा मिळतो. धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या या ट्रस्टचे अध्यक्षपद महापौरांकडे आहे. या ट्रस्टमध्ये उपमहापौर (उपाध्यक्ष), सहआयुक्त (सचिव), मुख्य लेखापाल (खजिनदार), स्थायी समिती सभापती, विधी समिती सभापती, सभागृह नेता, मुख्य लेखा परीक्षक व क्रीडा विभागाचे उपायुक्त (सदस्य) यांचा समावेश आहे. मात्र, प्रशासकीय राजवटीत महापौर नसल्याने ती मदत रुग्णांना मिळू शकत नाही आहे. दरम्यान, महापौरांच्या अध्यक्षतेखाली ट्रस्टचे कामकाज चालते. तत्कालीन महापौर उषा ढोरे यांची मुदत संपल्यापासून शहराचे प्रथम नागरिक असलेल्या महापौरांचे पद रिक्त आहे. गरजू रुग्णांना मदत करणाऱ्या ट्रस्टचे कामकाज पूर्णपणे बंद आहे.

#### महिन्याकाठी 20 हून अधिक मागणी अर्ज

राज्याच्या नगरविकास विभागाच्या 18 डिसेंबर 2007 च्या निर्णयानुसार पालिकेच्या वतीने ट्रस्टला दरवर्षी 25 लाख रुपयांचे अनुदान दिले जाते. पालिका अर्थसंकल्पात त्या रकमेची तरतूद केली जाते. या निधीतून हृदयरोग, कर्करोग, किडनी, मेंदूचे आजार असे विविध दुर्धर आजाराने ग्रासलेले, अपघातात गंभीर जखमी, नैसर्गिक आपत्तीने पीडित असलेल्या रुग्णांना मदत म्हणून ट्रस्टतर्फे प्रतिरुग्ण 5 हजार रुपये सहाय्य केले जाते. दरमहा किमान 20 रुग्ण किंवा त्यांचे नातेवाईक मदतीसाठी अर्ज करतात.

#### निधी देण्याबाबत मागणीने धरला जोर

महापालिकेचा महापौर निधी देणे बंद आहे. अनेक रुग्ण आर्थिक मदतीअभावी वेगवेगळ्या सामाजिक संस्थेकडे निधीसाठी धाव घेत आहेत. योग्य वेळी उपचार न मिळाल्यामुळे अडचणीत येत आहेत. पैश्याअभावी रुग्णांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मानवतेच्या दृष्टिकोनातून व सामाजिक बांधिलकीतून या निधीचे लेखापरीक्षण पूर्ण करून गरजू रुग्णांसाठी महापौर निधी पुन्हा सुरुवात करावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना

### पिंपरीतील भीमसृष्टी येथे आयोजित 'विचार प्रबोधन पर्व कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मपिंपरी चिंचवडमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विविध कार्यक्रमातून महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. पिंपरी महापालिकेच्या वतीने आयोजित केलेल्या विचार प्रबोधन पर्व कार्यक्रमातून महामानवाला सुरेल मानवंदना देण्यात आली.**





पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त ११ ते १६ एप्रिल २०२५ रोजी 'विचार प्रबोधन पर्वाचे आयोजन पिंपरी येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाशेजारील (भीमसृष्टी) मैदानात करण्यात आले आहे. शनिवार १२ एप्रिल रोजी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांचा महामानवांच्या गीतांचा बहारदार कार्यक्रम याठिकाणी संपन्न झाला.

या कार्यक्रमास अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य (सचिव दर्जा) गोरक्ष लोखंडे, उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, माजी नगरसदस्य बाबासाहेब त्रिभुवन,कार्यकारी अभियंता सतिश वाघमारे,क्रीडा अधिकारी अनिता केदारी, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,कामगार नेते गणेश भोसले,तुकाराम गायकवाड,उपअभियंता चंद्रकांत कुंभार तसेच महापालिका अधिकारी,कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी उपस्थिती लावली होती. सायंकाळी ७ वाजल्यापासूनच मैदानात गर्दी होऊ लागली आणि कार्यक्रमाच्या सुरुवातीला मैदान श्रोत्यांनी भरून गेले होते. या सांस्कृतिक सत्रात आनंद शिंदे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित अनेक गीते सादर केली.

कार्यक्रमादरम्यान सुप्रसिद्ध गायक आनंद प्रल्हाद शिंदे यांनी बाबासाहेबांच्या विचारांची आणि सामाजिक योगदानाची आठवण करून दिली. गाण्यांमधून त्यांनी सामाजिक समतेचा आणि बंधुत्वाचा संदेश दिला. विशेषतः नव्या पिढीपर्यंत डॉ. आंबेडकरांची शिकवण पोहोचवणे, हा उद्देश त्यांनी आपल्या सादरीकरणातून अधोरेखित केला. 'विचार प्रबोधन पर्वाचा उद्देश सामाजिक सुधारणांचे महत्त्व आणि महामानवांचे कार्य जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे असून, सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांच्या कार्यक्रमाने त्या उद्दिष्टाला प्रभावीपणे हातभार लागला. दरम्यान, महानगरपालिकेच्या वतीने आयोजित विचार प्रबोधन पर्वाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून १५ एप्रिलपर्यंत विविध सांस्कृतिक तसेच प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन पिंपरी येथे करण्यात आले आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### संतांचे ग्रंथ

संतांचे ज्ञानच असे असते की, त्यांना वेदांताचे मर्म आपोआप कळते. अमुक एक ग्रंथ कुणी लिहिला, केव्हा लिहिला, त्यामध्ये अमक्या पानावर काय आहे, या गोष्टी एक वेळ संतांना सांगता येणार नाहीत, पण त्या विषयाचे मर्म त्यांना बरोबर ठाऊक असते. आपण पोथीतले नुसते शब्द तेवढे वाचतो; त्यांचा अर्थ संतांच्या कृपेवाचून कळणे कठीण आहे. बापाचा निरोप लहान मूल आईला आपल्या बोबड्या शब्दांत आणि स्वत:ला कळला असेल तसा सांगत असते, तितपतच पोथीतल्या शब्दांचा अर्थ आज आपल्याला सांगता येईल. संतांनी ग्रंथ लिहिले याचे कारण, ज्यांना बुद्धीने खात्री करून घ्यायची आहे त्यांनी ती करून घ्यावी आणि परमार्थ करावा. संतांच्या वचनाचा ओढूनताणून अर्थ करू नये, त्याचा सरळ अर्थ घ्यावा. ग्रंथ वाचीत असताना आपली मते बाजूला ठेवावीत; एका अक्षरावर दुसरे अक्षर लिहिले, तर पहिले दिसत नाही आणि समजत नाही, म्हणून शुद्ध मनाने ग्रंथ वाचावा. आपल्या वडिलांचे पत्र जर आपल्याला आले तर आपण त्यातले अक्षर अन् अक्षर वाचतो. तसे, ज्ञानेश्वरी, दासबोध हे ग्रंथ अगदी मनापासून वाचावेत. पुष्कळ लोक जे पोथी ऐकायला जातात ते लोकांनी बरे म्हणावे यासाठी, किंवा करमत नाही यासाठी, किंवा इतर उद्योग नाही म्हणून जातात. असे करणे योग्य नाही. खरे म्हणजे, संतांचे ग्रंथ वाचून स्वत:ला काय करायला पाहिजे ते शोधून काढून तेवढे करणारे लोक थोडेच असतात. ते ग्रंथ वाचून त्यांचा अर्थ नीट समजणारे लोक त्यापेक्षा जास्त असतात; 'मोठ्या संताचा ग्रंथ आहे' म्हणून नुसता वाचणारे लोक त्याहून जास्त असतात; आणि त्याहीपेक्षा, ते ग्रंथ मुळीच न वाचणारे लोक फारच जास्त असतात ! जगाच्या प्रवाहाच्या उलट जायला संतांजवळ शिकायचे असते. संतांना व्यवहारापुरतीच देहाची स्मृती असते. ते देहाला सावलीप्रमाणे मानतात. सावलीला दु:ख झाले म्हणणे केव्हाही अयोग्यच. म्हणूनच संतांच्या मनावर सुखदु:खाचा परिणाम होत नाही. संतांकडे लोक कितीतरी कष्ट करतात आणि ते लोक यांच्या नात्यागोत्याचेही नसतात. संत त्यांना काही देत नसताना ते इतके कष्ट करतात, याचे कारण संतांचा त्यांच्याविषयी असणारा खरा आपलेपणा होय. संत एकांतात जातात याचे कारण असे की, निराळे असतात आणि एकांतात भेटणारे निराळे असतात. लोकांतात संतांची शांती बिघडते असे मुळीच नाही; पण एकांतात भेटणाऱ्यांना लोकांतात भेटता येत नाही,. बोधवचन:- कोणत्याही संताचा ग्रंथ वाचताना, तो कृतीत आणण्याकरिता आहे, ही भावना ठेवून वाचावा.



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार सत्तेवर येऊन चार महिने झाले. पहिल्या दिवसापासून या मंत्रिमंडळात रुसवे फुगवे सुरू झाले असून त्याच्यावर मार्ग काही निघत नाही..आपल्या राज्यात पूर्वी कधी नव्हते, एवढे प्रचंड बहुमत या सरकारकडे आहे. पण, म्हणतात ना सुख उपभोगण्यासाठी सुद्धा एक मानसिकता लागते..नेमका त्याचाच अभाव दिसतो आहे!**

# 'आलबेल' चा नारा फसवा, नाराज मंत्र्यांना घरी बसवा!



### एकनाथ शिंदे - अजित दादा पॅचअप ?

मंत्रिमंडळ सत्तेवर आले तेव्हा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नाराज असल्याच्या बातम्या रोज येत होत्या. मंत्रिमंडळ बैठकीला दांडी मारणे, सार्वजनिक ठिकाणी चेहऱ्यावर उत्साह न दाखवणे, वेळोवेळी सहकारी मंत्र्यांकडून नाराजीच्या वावड्या उठवणे, असे काहीसे चित्र दिसत होते आणि त्यामुळे या मंत्रिमंडळात एकनाथ शिंदे एकाकी पडलेत की काय ? या म्हणण्याला पुष्टी मिळत होती. जी गोष्ट त्यांची, तीच अजितदादांची! मंत्रिमंडळात राहून सरकारवर टीका करणे, हा अजितदादांच्या सहकाऱ्यांचा मूळ गुण..आणि प्रत्येक गोष्टीत आपण असमाधानी आहोत, असे दाखवणे हा सार्वजनिक गुण ! पण, आता या दोन ज्येष्ठ उपमुख्यमंत्र्यांमध्ये पॅचअप झाल्याच्या बातम्या येत असून कदाचित यापुढे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुरळीतपणे काम करण्याची चालना मिळू शकते, असे म्हणायला हरकत नाही !

### पालकमंत्रीपदाचा वाद अधांतरीच..

रायगड आणि नाशिक या दोन्ही ठिकाणच्या पालकमंत्री पदाचा वाद पहिल्या दिवसापासून सुरू आहे. एवढे ज्येष्ठ नेते असून सुद्धा, वादाचे हे भिजत घोंगडे का ठेवले आहे? याचा कुणालाच उलगडा होत नाही. महायुती मधील या दोन पक्षांची एकमेकांवर सुरू असलेली कुरघोडी म्हणूनच मुख्यमंत्र्यांना अस्वस्थ करत असेल. दुसरा मुद्दा असा जे चित्र पुढे येत आहे की पालकमंत्रीपदाचा चेंडू हा दिल्लीच्या कोर्टात पडला असून त्या ठिकाणी निर्णय होत नाही ! पण, एका राज्यातील दोन जिल्ह्यातील पालकमंत्रीपदाचा प्रश्न सोडवण्यासाठी केंद्रीय मंत्र्यांना हस्तक्षेप करावा लागणे, ही नाचक्की कोणाची ?

### आता म्हणे, आरोग्य राज्यमंत्री नाराज!

नाराजी नाट्याची चर्चा सुरू असतानाच आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर आरोग्य सन्मान पुरस्काराच्या कार्यक्रमात अनुपस्थित राहिल्या. या घटनेनंतर अनेक राज्यमंत्र्यांनी खासगीत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. आता सर्व राज्यमंत्री एकत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे सांगितले जात आहे. राज्यात 'महायुती' चे सरकार सत्तेवर आल्यानंतर मंत्र्यांमध्ये समन्वय नसल्याचा आणि अनेक जण नाराज असल्याचा प्रकार समोर आला आहे.

### कॅबिनेट मंत्री जबाबदार?

राज्यातील राज्यमंत्री अत्यंत नाराज असल्याचे सांगितले जात आहे. त्याला कारण कॅबिनेट मंत्री आहेत. कॅबिनेट मंत्र्यांनी राज्यमंत्र्यांना अधिकाराचे वाटप केलेले नाही. त्यामुळेच मेघना बोर्डीकर आपल्याच खात्याच्या आरोग्य सन्मान पुरस्काराच्या कार्यक्रमात अनुपस्थित राहिल्या.

### प्रत्येक गोष्टीला विलंब हवाच का?

देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ दि. ५ डिसेंबर २०२४ रोजी घेतली. त्यानंतर दीर्घ कालावधीनंतर मंत्र्यांचा शपथविधी झाला. मग, खातेवाटप रेंगाळले होते. त्यानंतर पालकमंत्रीपदाची जबाबदारी लवकर दिली गेली नाही. जबाबदारी दिल्यानंतर नाशिक, रायगडच्या पालकमंत्रीपदवरून वाद सुरु झाला. हा वाद अजूनही मिटलेला नाही. तसेच धाराशिवमध्येही पालकमंत्रीपदावरुन भाजपा आणि शिवसेनेत वाद सुरु झाला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना पालकमंत्रीपदावरुन हटवण्याची मागणी भाजपा करत आहे. आतातर कॅबिनेट आणि राज्यमंत्री यांच्यातील वाद समोर आला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी गृहखाते स्वतःकडे ठेवले आहे. त्यांनी गृह मंत्रालयाच्या अधिकाराचे वाटप करत काही अधिकार राज्यमंत्री योगेश कदम यांना दिले आहेत. यामुळे शिवसेना गटातून मंत्री झालेले योगेश कदम अनेक प्रकरणात थेटपणे भूमिका मांडत आहेत.

### इतर कॅबिनेट मंत्र्यांचे काय?

मुख्यमंत्र्यांप्रमाणे अधिकार इतर कॅबिनेट मंत्र्यांनी राज्यमंत्र्यांना दिलेले नाहीत. यामुळे राज्यमंत्री नाराज आहेत, असा सर्वसाधारण सूर आहे. आता मुख्यमंत्री फडणवीस यांनीच या प्रकरणात लक्ष घालावे, या मागणीसाठी सर्व राज्यमंत्री फडणवीस यांची भेट घेणार आहेत, असे सांगण्यात आले आहे.

### मंत्र्यांमध्ये अधिकारवादाची लागण..

राज्यात महायुतीच्या मंत्रिमंडळात ३९ मंत्री होते. त्यातून धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतल्यानंतर ही संख्या ३८ झाली आहे. शिवसेनेचे ११, राष्ट्रवादीचे ८ आणि भाजपचे १९ मंत्री आहेत. यामध्ये अधिकारवाद सुरु झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हा विषय कसा सोडवतात? याकडे मंत्रिमंडळाचे आणि राज्याचे लक्ष लागले आहे. पण हा मुद्दा लवकरात लवकर सुटावा, ही एक छोटीशी मागणी राज्यात सुखी आणि समाधानी होण्याची इच्छा बाळगणाऱ्या जनतेकडून होत आहे, हे नक्की !

### रिमोट कंट्रोल कार्यालयाकडे..

अक्षरशः पाशवी बहुमताने सत्तेत आलेल्या 'ट्रिपल इंजिन' च्या 'महायुती' सरकारचा चार महिने होऊनही अद्याप सूर लागत नाही. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार यांच्यात एकसंधपणाचा दिखावा केला जात असला, तरी एकमेकांवर कुरघोड्यांचे राजकारण सुरूच आहे आणि ते स्पष्टपणे जाणवत आहे. त्यात सर्वच मंत्र्यांच्या ओएसडी नियुक्तीचा अधिकार मुख्यमंत्री कार्यालयाचा असल्याचे स्पष्ट करीत फडणवीस यांनी एकप्रकारे आपल्याकडेच संपूर्ण कंट्रोल ठेवला आहे. दुसरीकडे शिंदे मुख्यमंत्री असताना घेतलेल्या अनेक निर्णयांना कात्री लावली जात आहे. अशातच कैबिनेट मंत्र्यांनाच अधिकार नसतील तर त्यातून खाली राज्यमंत्र्यांना तर काय अधिकार असणार? त्यामुळे एकूणच मुख्यमंत्री कार्यालयाच्या रिमोटला सर्वजण वैतागले आहेत.

### नाराज मंत्र्यांना घरी बसवा!

खेडेगावात म्हणतात ना, हातात चणे मिळाले आहेत,पण खायला दात नाहीत.. अशी काहीशी अवस्था सध्याच्या महायुती सरकारची झाली आहे की काय, अशी शंका येण्याइतपत नाराजी नाट्य सुरू आहे. पण, आता कोणालाही न जुमानता आणि कोणाचीही नाराजी न हटवता अशा मंत्र्यांना मुख्यमंत्र्यांनी थेट घरी बसवावे, अशी केवीलवाणी मागणी मतदारांनी केली तर त्यात त्यांचे काय चुकले ?

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शरद पवार - अजित पवार एकत्र!

## राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल यांच्या वक्तव्यामुळे भुवया उंचावल्या



### खेळीमेळीच्या वातावरणात भेटलो

आणि शरद पवार हे या संस्थेचे अध्यक्ष आहेत. त्या संस्थेच्या कार्यकारिणीच्या दृष्टीने शरद पवार आणि अजित पवार एकत्र आले तर तो काही विषय नाही. बारामतीचा विकास असो, महाराष्ट्राचा विकास असो याबाबत जर शरद पवारांशी संवाद झाला असेल तर त्यात काही चुकीचं नाही. महाराष्ट्राच्या विकासासाठी जर दोघे एकत्र येत असतील तर त्यात चुकीचं नसल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल यांनी दिली.आम्ही अमित शाह यांच्याकडे कुठलीही तक्रार केली नाही, खंत व्यक्त केली नाही. महायुतीचे सगळे नेते हजर होते. खेळीमेळीच्या वातावरणात आम्ही भेटलो.

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षात २०२३ मध्ये मोठी फूट पडली आहे. अजित पवार हे ४१ आमदारांना घेऊन बाहेर पडले. त्यानंतर २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत पवार विरुद्ध पवार असा सामना महाराष्ट्राने पाहिला. लोकसभा निवडणुकीत बारामतीतून सुप्रिया सुळे निवडून आल्या. तसंच मविआला चांगलं यश मिळालं. तर विधानसभेत अजित पवारांच्या पक्षाचे ४२ आमदार निवडून आले. दरम्यान विधानसभा निवडणुकीनंतर दोन्ही पवार एकत्र येतील अशा चर्चा रंगत आहेत. आता प्रफुल्ल पटेल यांनी एक वक्तव्य केलं आहे ज्यामुळे सगळ्यांच्याच भुवया उंचावल्या आहेत.**

विधानसभा निवडणुकीनंतर शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि अजित पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हे दोन्ही एकत्र येतील अशा चर्चा रंगल्या होत्या. विधानसभा निवडणुकीचा निकाल २४ नोव्हेंबरला लागला होता. त्यानंतर १२ डिसेंबरला शरद पवार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी अजित पवार आणि त्यांच्या पक्षातले लोक दिल्लीत गेले होते. तेव्हापासून या चर्चा रंगल्या आहेत. मात्र हे दोन पक्ष एकत्र आलेले नाहीत. दरम्यान रयत शिक्षण संस्थेबाबत शरद पवार आणि अजित पवार यांच्यात चर्चा झाली. जानेवारी महिन्यातही यासंदर्भातली काही विधानं झाल्यानंतर चर्चा रंगल्या होत्या. तसंच विधानसभा निवडणुकीनंतर अजित पवार यांनीही शरद पवारांवर टीका करणं थांबवलेलं दिसून आलं. या सगळ्या पार्श्वभूमीवर आता प्रफुल्ल पटेल यांचं एक विधान समोर आलं आहे.रयत शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातली मोठी संस्था आहेत. लाखो विद्यार्थी या ठिकाणी शिकत आहेत. या संस्थेचे विश्वस्त अजित पवार आहेत आणि शरद पवार हे या संस्थेचे अध्यक्ष आहेत. त्या संस्थेच्या कार्यकारिणीच्या दृष्टीने शरद पवार आणि अजित पवार एकत्र आले तर तो काही विषय नाही. बारामतीचा विकास असो, महाराष्ट्राचा विकास असो याबाबत जर शरद पवारांशी संवाद झाला असेल तर त्यात काही चुकीचं नाही. महाराष्ट्राच्या विकासासाठी जर दोघे एकत्र येत असतील तर त्यात चुकीचं नसल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल यांनी दिली.आम्ही अमित शाह यांच्याकडे कुठलीही तक्रार केली नाही, खंत व्यक्त केली नाही. महायुतीचे सगळे नेते हजर होते. खेळीमेळीच्या वातावरणात आम्ही भेटलो. महाराष्ट्रात महायुती भक्कमपणे चालवायची कशी याबाबतच आम्ही चिंतन केलं असंही प्रफुल्ल पटेल यांनी म्हटलं आहे. विधानसभा निवडणुकीनंतर शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि अजित पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हे दोन्ही एकत्र येतील अशा चर्चा रंगल्या होत्या. विधानसभा निवडणुकीचा निकाल २४ नोव्हेंबरला लागला होता. त्यानंतर १२ डिसेंबरला शरद पवार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी अजित पवार आणि त्यांच्या पक्षातले लोक दिल्लीत गेले होते. तेव्हापासून या चर्चा रंगल्या आहेत. मात्र हे दोन पक्ष एकत्र आलेले नाहीत. दरम्यान रयत शिक्षण संस्थेबाबत शरद पवार आणि अजित पवार यांच्यात चर्चा झाली. जानेवारी महिन्यातही यासंदर्भातली काही विधानं झाल्यानंतर चर्चा रंगल्या होत्या. तसंच विधानसभा निवडणुकीनंतर अजित पवार यांनीही शरद पवारांवर टीका करणं थांबवलेलं दिसून आलं. या सगळ्या पार्श्वभूमीवर आता प्रफुल्ल पटेल यांचं एक विधान समोर आलं आहे.रयत शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातली मोठी संस्था आहेत. लाखो विद्यार्थी या ठिकाणी शिकत आहेत. या संस्थेचे विश्वस्त अजित पवार आहेत.

# आता शाळकरी विद्यार्थ्यांच्या मागेही ईडी

## गुलाबराव पाटलांच्या वक्तव्यावरून रोहित पवारांचा प्रश्न



### विद्यार्थी फोडले पाहिजेत

"आता आपल्याला देखील बदलण्याची गरज आहे. माझ्या स्वतःच्या दोन शाळा आहेत. माझ्या शाळेतील शिक्षक परवापासून विद्यार्थी जमा करण्यासाठी (संख्या वाढवण्यासाठी) कामाला लागले आहेत. आम्ही जसं पक्षाचे लोक, आमदार फोडतो, तसं तुम्ही (इंग्रजी शाळेचे) विद्यार्थी फोडले पाहिजेत",

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पुरेशा पटसंख्येअभावी जळगाव जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा बंद करण्याची वेळ आलेली आहे. अशा स्थितीत, "शिक्षकांनी नुसते हातावर हात धरून बसून राहू नये. आम्ही राजकारणी जसे पक्ष फोडतो, तसेच तुम्हीही दुसऱ्या शाळांमधील विद्यार्थी फोडा आणि शाळा चालवा", असा अजब सल्ला राज्याचे पाणीपुरवठा, स्वच्छता मंत्री तथा जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी जळगावमधील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षकांना दिला आहे.**

गुलाबराव पाटलांच्या या सल्ल्यामुळे त्यांच्यावर आता विरोधकांकडून टीका होऊ लागली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी यावरून पाटलांना टोला लगावला आहे. सरकार आता विद्यार्थ्यांना फोडण्यासाठी त्यांच्या मागे देखील ईडी, सीबीआय आणि आयटीच्या चौकशीचा ससेमिरा लावणार का? असा प्रश्न देखील रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे. रोहित पवार यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की आता विद्यार्थी फुटले नाही तर त्यांच्यामागेही मंत्री गुलाबराव पाटील सक्तवसुली संचालनालय (ईडी), केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) आणि आयकर विभागाच्या (आयटी) चौकशीचा ससेमिरा लावतात की काय, याची भीती वाटतेय. मंत्री गुलाबराव पाटील यांनी विद्यार्थी फोडाफोडीपेक्षा सरकारी शाळांमध्ये पुरेशा सुविधा आणि शिक्षकांच्या माध्यमातून शाळांची गुणवत्ता सुधारावी. असं केल्यास शाळांसमोर विद्यार्थ्यांच्या रांगा लागतील.जळगावात 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रमांतर्गत तालुकास्तरावरील विजेत्या शाळांना शनिवारी (१२ एप्रिल) पालकमंत्री गुलाबराव पाटलांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. जळगाव ग्रामीण विघातली जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये सध्या एकूण ४५ हजार विद्यार्थी आहेत, त्यामध्ये अलीकडच्या काळात कोणत्याही प्रकारची वाढ झालेली नाही. अनेक शाळा पुरेशा पटसंख्येअभावी बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.

त्याविषयी या कार्यक्रमात चिंता व्यक्त करताना पालकमंत्री पाटील यांनी शिक्षकांना दुसऱ्या शाळांमधील, प्रामुख्याने इंग्रजी शाळांमधील विद्यार्थी पळवून पटसंख्या वाढवण्याचा सल्ला दिला आहे.गुलाबराव म्हणाले होते,

# कन्हैया कुमार यांच्या अडचणी वाढणार?

## पंतप्रधान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविरोधात अपमानास्पद भाषा वापरल्याचा आरोप

। ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भाजपाकडून काँग्रेसचे नेते कन्हैया कुमार यांच्याविरोधात बिहारची राजधानी पाटणा येथे पोलीस तक्रार दाखल करण्यात आली आहे. एका टीव्ही चॅनलला दिलेल्या मुलाखतीदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविरोधात अपमानास्पद भाषा वापरल्याचा आरोप भाजपाकडून करण्यात आला आहे.**



या तक्रारीमध्ये भाजपाच्या वतीने दावा करण्यात आला आहे की, कन्हैया कुमार यांनी एका खाजगी टीव्ही चॅनलला मुलाखत दिली आणि यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि आरएसएस बद्दल अत्यंत आक्षेपार्ह आणि बेजबाबदार वक्तव्य केली. भाजपाचे बिहारमधील मीडिया प्रभारी दानिश इकबाल यांच्या नेतृत्वाखालील एका शिष्टमंडळाकडून पोलिसांकडे कन्हैय्या कुमार यांच्याविरोधात एफआयआर नोंदवण्याची विनंती करण्यात आली होती. नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कन्हैय्या कुमार हे काँग्रेसचा चेहरा ठरू शकतात.कन्हैय्या कुमार जे 'तुकडे-तुकडे गँग'चा भाग आहेत त्यांनी ११ एप्रिल रोजी एका टीव्ही चॅनलला दिलेल्या मुलाखतीमध्ये बोलताना पंतप्रधान मोदी आणि आरएसएस यांच्यासह त्यांच्या विचारधारेबद्दल अपमानजनक भाषा वापरली, हे आक्षेपार्ह आणि अस्वीकार्य आहे, असे इकबाल म्हणाले आहेत. पीटीआयने यासंबंधीचे वृत्त दिले आहे.तक्रार दाखल केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना इकबाल म्हणाले, "एका खाजगी टीव्ही चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत, 'तुकडे-तुकडे गँग'चा भाग असलेल्या कन्हैया कुमार यांनी पंतप्रधान मोदी आणि आरएसएसविरुद्ध अपशब्द वापरले आणि त्यांना 'दहशतवादी' असे संबोधले. मी सोनिया गांधी आणि राहुल गांधींना विचारू इच्छितो की, तुम्ही याबद्दल गप्प बसणार आहात की या देशद्रोह्यांना काबूत ठेवणार आहात?""आम्ही त्यांच्याविरोधात तक्रार दाखल केली आहे.

आणि पोलिसांनी तात्काळ एफआयआर नोंदवावा अशी मागणी केली आहे. आम्हाला पूर्णपणे विश्वास आहे की पोलीस योग्य ती कारवाई करतील, असेही इकबाल म्हणाले. कन्हैया कुमार यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करताना, इकबाल यांनी दावा केला की जेएनयूच्या माजी विद्यार्थ्याच्या वक्तव्यातून जनतेच्या भावना दुखावण्याचा आणि अशांतता निर्माण करण्याचा त्याचा हेतू दिसून येतो.माजी जेएनयू विद्यार्थी कन्हैया कुमार यांच्या वक्तव्यातून जनतेच्या भावना दुखावणे आणि अशांतता निर्माण करणे हा त्यांचा हेतू दिसून येतो असा दावाही इक्बाल यांनी केला आहे. याबरोबरच त्यांनी तात्काळ कायदेशीर कारवाईची मागणी देखील केली आहे. "भाजपाच्या पाटणा येथील कार्यालयात इतर सहकारी कार्यकर्त्यांसह ही मुलाखत पाहाताना आम्हाला यामधील वक्तव्ये खूपच आक्षेपार्ह वाटले. कार्यालयातील इतरही अनेक जण हे पाहून नाराज झाले होते, असेही इक्बाल म्हणाले. या तक्रारीमध्ये भाजपाच्या वतीने दावा करण्यात आला आहे की, कन्हैया कुमार यांनी एका खाजगी टीव्ही चॅनलला मुलाखत दिली आणि यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि आरएसएस बद्दल अत्यंत आक्षेपार्ह आणि बेजबाबदार वक्तव्य केली. भाजपाचे बिहारमधील मीडिया प्रभारी दानिश इकबाल यांच्या नेतृत्वाखालील एका शिष्टमंडळाकडून पोलिसांकडे कन्हैय्या कुमार यांच्याविरोधात एफआयआर नोंदवण्याची विनंती करण्यात आली होती.

### आरएसएसविरुद्ध अपशब्द वापरले

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कन्हैय्या कुमार हे काँग्रेसचा चेहरा ठरू शकतात.कन्हैय्या कुमार जे 'तुकडे-तुकडे गँग'चा भाग आहेत त्यांनी ११ एप्रिल रोजी एका टीव्ही चॅनलला दिलेल्या मुलाखतीमध्ये बोलताना पंतप्रधान मोदी आणि आरएसएस यांच्यासह त्यांच्या विचारधारेबद्दल अपमानजनक भाषा वापरली, हे आक्षेपार्ह आणि अस्वीकार्य आहे,तक्रार दाखल केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना इकबाल म्हणाले,तुकडे-तुकडे गँग'चा भाग असलेल्या कन्हैया कुमार यांनी पंतप्रधान मोदी आणि आरएसएसविरुद्ध अपशब्द वापरले आणि त्यांना 'दहशतवादी' असे संबोधले.

# नाहीतर तुरुंगात जाण्यासाठी तयार रहा

## विदेशी नागरिकांना डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाचा इशारा

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अमेरिकेतील विदेशी नागरिकांसाठी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सरकारने नवे नियम लागू केले आहेत. आता अमेरिकेत ३० दिवसांहून अधिक काळ अवैध वास्तव्यास असलेल्या सर्व विदेशी नागरिकांना त्यांची नोंदणी करावी लागणार आहे. यात कसूर करणाऱ्यांना दंड किंवा कारावास भोगावा लागू शकतो. व्हाइट हाऊसने सदर नियम लागू केले आहेत. डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर अमेरिकेत अवैधरित्या राहणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यास सुरुवात झाली.**



अनेकांना लष्करी विमानाद्वारे त्यांच्या देशात परत धाडण्यात आले आहे. त्यानंतर पुन्हा ट्रम्प प्रशासन पुन्हा आक्रमक झाले आहे.होमलँड सिक्युरिटी विभागाने सदर आदेश काढले आहेत. व्हाइट हाऊसच्या प्रेस सेक्रेटरी कॅरोलिन लेविट यांनी सांगितले की, ३० दिवसांहून अधिक दिवस राहणाऱ्या सर्वांनाच फेडरल सरकारकडून नोंदणी करून घ्यावी लागणार आहे. असे न करणाऱ्यांना कारवासाची शिक्षा किंवा हद्दपारी सारख्या कारवाईला सामोरे जावे लागू शकते.होमलँड सिक्युरिटीने दिलेल्या निर्देशानुसार, अमेरिकेत अवैधरित्या राहणाऱ्यांनी एक तर स्वतःहून निघून जावे किंवा स्वतः हद्दपार व्हावे. होमलँड सिक्युरिटीच्या एक्स हँडलवर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि गृह सुरक्षा विभागाचे सचिव क्रिस्टी नोएम यांना टॅग करत सदर पोस्ट करण्यात आलेली आहे.सदर पोस्टनुसात्यांनी अजूनही अमेरिका सोडली नसेल तर त्यांना प्रति दिन ९९८ डॉलरचा दंड भरावा लागेल. तसेच ज्यांनी देश सोडण्याची घोषणा केली आहे, मात्र तसे करण्यास असमर्थ ठरले आहेत, अशांना १००० ते ५००० डॉलर्स दरम्यान दंड भरावा लागू शकतो किंवा कारावासाची शिक्षाही होऊ शकते.ज्या लोकांनी एच-१बी व्हिसा आणि विद्यार्थी म्हणून अमेरिकेत प्रवेश मिळविला आहे, त्यांच्यावर या निर्णयाचा थेट परिणाम होणार नाही. याव्यतिरिक्त असलेल्या इतर विदेशी नागरिकांना मात्र या निर्णयाचा थेट फटका बसेल. एच-१बी व्हिसानुसार नोकरी मिळवून जर ती गमावली असेल आणि ठरलेल्या मुदतीत देश सोडला नसेल तर त्यावर मात्र कारवाई होऊ शकते.होमलँड सिक्युरिटीने सांगितलेल्या नियमानुसार स्वतःहून देशाबाहेर जाण्याचा निर्णय लोकांसाठीच फायदेशीर आहे. एकतर अशा व्यक्ती त्यांच्या जाण्यासाठीचा विमानाचा पर्याय निवडू शकतात आणि गुन्ह्यांची नोंद होण्यापासून टाळू शकतात. तसेच जे लोक स्वतःहून देश सोडत आहेत.

### बाहेर जाणे फायदेशीर सुरक्षित

बरोबर नेऊ शकतात आणि त्यांच्यावर कोणताही गुन्हा दाखल होणार नाही. ज्या लोकांना देशाबाहेर जाणे परवाडणारे नाही अशा लोकांसाठी अनुदानित विमानाने घरी जाण्यासाठी सोय केली जात आहे.अमेरिकेतील विदेशी नागरिकांसाठी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सरकारने नवे नियम लागू केले आहेत.

# इरफान खानबद्दल बोलताना बॉलीवूड अभिनेता भावुक

बॉलीवूडमध्ये असे काही कलाकार आहेत, ज्यांचे चित्रपटसृष्टीतील योगदान मोठे आहे. इरफान खान हे अशा कलाकारांपैकी एक आहेत. अनेक चित्रपटांतून वेगवेगळ्या भूमिका साकारत त्यांनी चित्रपटसृष्टीत आपले वेगळे स्थान निर्माण केले होते. आता लेखक मनू ऋषी यांनी एका मुलाखतीदरम्यान, इरफान खान यांच्या आठवणींना उजाळा दिला आहे.एका यूट्यूब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत अभिनेता आणि लेखक मनु ऋषी यांनी इरफान खान यांच्या आठवणींना उजाळा दिला आहे. इरफान खान यांनी एका डायरेक्टरसाठी कथा लिहिण्याचे सूचवले होते, याची आठवण सांगितली आहे. ते म्हणतात, "एका दिग्दर्शकासाठी मी एक कथा लिहिली होती. जेव्हा दिग्दर्शकाबरोबर माझी भेट झाली, त्यावेळी त्यांनी प्रोजेक्ट देण्याआधी टेस्ट म्हणून मला एक सीन लिहायला सांगितले. मी त्या दिग्दर्शकाला म्हटले की, एक तर तुम्हाला माझ्या कामावर विश्वास ठेवायला लागेल किंवा इरफानने जे सूचवलं आहे, त्यावर विश्वास दाखवायला लागेल.तुम्ही माझे काम पाहिले नाही, नाहीतर तुम्ही असा प्रश्न विचारला नसता. जर मी तुम्हाला एखादा सीन दिग्दर्शित करायला सांगितला, तर तुम्हाला कसे वाटेल? त्यावर दिग्दर्शकाने मला सांगितले की, मी सहा चित्रपट दिग्दर्शित केले आहेत. मी त्याला म्हटले, मी ११ चित्रपटांसाठी कथा लिहिल्या आहेत. तुम्ही माझे काम पाहिले नाही, म्हणून मी नाराज नाही; तर इरफानने सांगितलेल्या गोष्टींवरदेखील तुम्ही विश्वास ठेवला नाही, याचे मला वाईट वाटत असल्याचे मी त्यांना म्हटले."पुढे ते म्हणतात, "त्या रात्री इरफान माझ्याकडे आला आणि मी स्वत:ची बाजू ठामपणे मांडल्याबद्दल माझे कौतुक केले.

# अजय देवगणला अभिवादन न केल्याने चित्रपटातून काढलं

'सन ऑफ सरदार २'मधून अभिनेते विजय राज यांना काढण्यात आलं आहे. याप्रकरणी निर्माते व विजय राज वेगवेगळी कारणं सांगत आहेत. अजय देवगणला (AJAY DEVGN) अभिवादन न केल्याने चित्रपटातून काढून टाकण्यात आलं, असा दावा विजय राज यांनी केला आहे, तर वाईट वर्तन आणि महागड्या खोलीची मागणी केल्याने त्यांना चित्रपटातून काढल्याचं निर्मात्यांनी म्हटलं आहे.'पिंकव्हिला'ला दिलेल्या मुलाखतीत निर्माते कुमार मंगत म्हणाले, "होय, हे खरंय आहे आम्ही विजय राज यांना त्यांच्या सेटवरील वागणुकीमुळे चित्रपटातून काढून टाकलं आहे. त्यांनी मोठ्या खोल्या व व्हॅनिटी व्हॅनची मागणी केली. त्यांनी स्पॉट बॉईजसाठी आमच्याकडून जास्त पैसे मागितले. त्यांच्या स्पॉट बॉयला एका दिवसाचे २० हजार दिले जात होते, जे खूप जास्त आहेत. यूके महागडे ठिकाण आहे आणि शूटिंगदरम्यान प्रत्येकाला स्टँडर्ड खोल्या देण्यात आल्या होत्या, पण त्यांनी प्रीमियम सूटची मागणी केली. आम्ही त्यांना खर्चाची परिस्थिती समजावून सांगण्याचा प्रयत्न केला पण त्यांनी नकार दिला. तसेच ते उद्धटपणे म्हणाले, 'तूच माझ्याकडे आलास, मी तुझ्याकडे काम मागायला आलो नाही'. त्याचं असं वागणं दिवसेंदिवस वाढतच चाललं होतं. त्यांनी तीन कर्मचाऱ्यांच्या प्रवासासाठी दोन कारची मागणी केली होती," असा दावाही मंगत यांनी केला.याप्रकरणी विजय राज यांनी वेगळंच कारण सांगितलं आहे. पहिल्या दिवशी सेटवर अजय देवगणला अभिवादन न केल्यामुळे चित्रपटातून काढून टाकल्याचा दावा त्यांनी केला. "मी वेळेआधीच सेटवर पोहोचलो होतो.

# ट्विंकल खन्नाची संतप्त पोस्ट

कोलकातामध्ये ट्रेनी डॉक्टरवर झालेल्या बलात्कार प्रकरणामुळे देशात सध्या संतापाचे वातावरण पाहायला मिळत आहे. बॉलीवूडमधील अनेक कलाकारांनी यावर संताप व्यक्त केला आहे. कंगना रणौत, आलिया भट्ट, विजय वर्मा, परिणीती चोप्रा, करीना कपूर खान या कलाकारांनी या घटनेवर व्यक्त होत संताप व्यक्त केला आहे. आता ट्विंकल खन्नानेदेखील सोशल मीडियावर संताप व्यक्त केला आहे.ट्विंकल खन्नाने इन्स्टाग्रामच्या अधिकृत अकाउंटवरून या घटनेवर भाष्य केले आहे. स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्टला तिने इन्स्टाग्राम पोस्ट करीत लिहिले की, मला ज्या लहानपणी गोष्टी शिकवल्या जात होत्या, त्याच गोष्टी मी माझ्या मुलीला शिकवत आहे. अभिनेत्री ट्विंकल खन्नाने आपल्या पोस्टमध्ये लिहिले, "या पृथ्वीवरील आणि देशातील ५० वर्षे आणि मी माझ्या मुलीला त्याच गोष्टी शिकवत आहे, ज्या लहान असताना मला शिकविल्या गेल्या होत्या. एकटी पार्कमध्ये जाऊ नको, शाळेत जाऊ नको, समुद्रकिनाऱ्यावर जाऊ नको.



# अफेअर अन् लग्न

प्यार का पंचनामा' फेम लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री सोनाली सेहगल आई होणार आहे. वर्षभरापूर्वी सोनालीने व्यावसायिक बॉयफ्रेंड आशीष सजनानीशी लग्न केलं. आता तिने गूड न्यूज दिली आहे. सोनालीने इन्स्टाग्रामवर फोटो पोस्ट करून याबद्दल चाहत्यांना माहिती दिली आहे.१५ ऑगस्ट रोजी टीव्हीवरील 'गोपी बहू' म्हणजेच देवोलिना भट्टाचार्जीने प्रेग्नेंसीची घोषणा केली होती. आता एका दिवसानंतर बी-टाऊनची प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली सहगल हिने आनंदाची बातमी दिली आहे. लग्नाच्या एक वर्षानंतर सोनाली आई होणार आहे.३५ वर्षीय सोनाली सहगलने इन्स्टाग्रामवर फोटो पोस्ट घोषणा करून गूड न्यूज दिली आहे. तिने तीन फोटो शेअर केले आहेत, ज्यात एका फोटोमध्ये तिचा बेबी बंप दिसतोय आणि ती काहीतरी खाताना दिसत आहे. तर तिच्या शेजारी तिचा पती बिअरची बाटली आणि हातात एक बाळाच्या दुधाची बाटली धरलेला दिसत आहे. अभिनेत्रीच्या समोर बेडवर चिप्स, बिस्किट व पुस्तकं दिसत आहेत.सोनालीने कॅप्शनमध्ये लिहिलं, "बिअरच्या बाटल्यांपासून बाळाच्या दुधाच्या बाटलीपर्यंत आशिषचे आयुष्य बदलणार आहे. माझ्या बाबतीत काही गोष्टी तशाच राहतील. आधी मी माझ्यासाठी खायचे आता दोघांसाठी खाते. दुसरीकडे समशेर (सोनालीचा श्वान) चांगला मोठा भाऊ होण्यासाठी नोट्स काढत आहे. मी खूप कृतज्ञ व आनंदी आहे. प्रार्थना करा." सोनालीच्या बाळाचा जन्म डिसेंबरमध्ये होईल असंही तिने सांगितलं.सोनाली सहगलने ७ जून २०२३ रोजी बिझनेसमन आशिष सजनानीशी लग्न केलं. या जोडप्याने पाच वर्षे एकमेकांना गुपचूप डेट केलं होतं. त्यानंतर मुंबईत लग्नगाठ बांधली.




# 'ते' शब्द ऐकून ऐश्वर्या रायला झालेले अश्रू अनावर

बच्चन कुटुंब हे नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. मग ते चित्रपट असो वा त्यांचे वैयक्तिक आयुष्य. अमिताभ बच्चन यांच्या सोशल मीडियावरील पोस्टमुळेदेखील अनेकदा चर्चांना उधाण येते. याआधी त्यांनी जाण्याची वेळ झाली, अशी एक पोस्ट शेअर केली होती. नुकतीच त्यांनी मी जातोय, अशी एक पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे. यांच्या या पोस्टमुळे चाहते चिंतेत असल्याचे दिसत आहे. याबरोबरच अनेकदा सहकलाकार त्यांच्याबरोबर काम करण्याचे किस्से सांगतात. काही दिवसांपूर्वी ऐश्वर्या राय(AISHWARYA RAI)व अभिषेक बच्चन यांचा घटस्फोट होणार असल्याचे म्हटले जात होते. त्याला जया बच्चन(JAYA BACHCHAN) जबाबदार असल्याचेदेखील म्हटले गेले. मात्र, ऐश्वर्या व अभिषेक यांनी कार्यक्रमांना एकत्र हजेरी लावल्याचे दिसले. त्यानंतर या चर्चांना पूर्णविराम मिळाला. आता या सगळ्यात जया बच्चन आणि ऐश्वर्या राय यांचा एक जुना व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.एक काळ असा होता की, ऐश्वर्या राय व जया बच्चन यांच्यात उत्तम बॉण्डिंग असल्याचे दिसत होते. मात्र, काही काळापासून त्या एकत्र दिसल्या नाहीत. या सगळ्यात सोशल मीडियावर जया बच्चन व ऐश्वर्या राय यांचा एक व्हिडीओ नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहे.

# डगआऊटमधून हिटमॅन कसा ठरला गेमचेंजर?

## रोहितचा एक निर्णय अन् नवा चेंडू ठरला सामन्याचा टर्निंग पॉईंट

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**मुंबई इंडियन्सने आयपीएल २०२५ मध्ये जोरदार पुनरागमन केलं आहे. सलग दोन सामने गमावल्यानंतर मुंबईचं नशीब उजळलं आणि संघाने थरारक विजयाची नोंद केली. दिल्ली कॅपिटल्सच्या घरच्या मैदानावर मुंबईने दिल्लीच्या जबड्यातून विजय हिसकावून घेतला.१९व्या षटकात सलग तीन चेंडूवर तीन खेळाडू धावबाद होत मुंबईने अनोखा विजय नोंदवला.**



### फिरकीपटूला गोलंदाजी द्या

मुंबई इंडियन्सचा संघ १४व्या षटकानंतर नवा चेंडू घेत होता. आयपीएलमधील नव्या नियमानुसार दुसऱ्या डावात गोलंदाजी करताना जर दव असेल तर गोलंदाजी करणारा संघ नवीन चेंडू घेऊ शकतो. मुंबईने या नियमाचा वापर केला. तितक्यात रोहित शर्माने डगआऊटमधून इशारा केला की दोन्ही बाजूंनी फिरकीपटूला गोलंदाजी द्या. रोहितने संघाचे गोलंदाजी प्रशिक्षक पारस म्हांब्रे यांच्याबरोबर या निर्णयाची चर्चा केली आणि नंतर कोचला देखील माहिती दिली.मैदानावर हार्दिकनेही रोहित आणि कोचच्या या निर्णयाची लगेच अंमलबजावणी केली आणि कर्ण शर्माला चेंडू दिला. त्याने तिसऱ्या चेंडूवर ट्रिस्टन स्टब्सला नमन धीरकरवी झेलबाद केलं आणि षटकात फक्त ६ धावा दिल्या. तर १५वं षटक मिचेल सँटनरने टाकलं त्याने या षटकात ७ धावा दिल्या. पुन्हा पुढील १६वं षटक कर्ण शर्माने टाकलं ज्याने या षटकातील तिसऱ्या चेंडूवर केएल राहुलला बाद करत दिल्लीला मोठा धक्का दिला.

पण मुंबईच्या विजयाचा नेमका टर्निंग पॉईंट काय ठरला? जाणून घेऊया.२०२५ च्या आयपीएलमध्ये आतापर्यंत दिल्लीचा संघ विजयाच्या रथावर स्वार होता. या सामन्यातही दिल्लीचा संघ विजयाच्या उंबरठ्यावर होता, पण शेवटी संघाने ६४ धावांच्या आत ९ विकेट गमावल्या, ज्यामध्ये सलग तीन खेळाडू धावबाद होण्याचा चमत्कार पाहायला मिळाला. एवढंच नाही तर एक फलंदाज स्टंपिंगवरही बाद झाला. दिल्लीकडून करुण नायरने ८९ धावांची खेळी केली, पण दुर्दैवाने त्याची मेहनत वाया गेली. कर्ण शर्माला आज या सामन्यात इम्पॅक्ट प्लेअर म्हणून खेळण्याची संधी मिळाली आणि त्याने संधीचं सोन करत मुंबईसाठी विजयाची कहाणी लिहिली. कर्ण शर्माने अभिषेक पोरेलला झेलबाद करत पहिली विकेट मिळवली. यानंतर पुढच्या षटकात सँटनरने करूण नायरला क्लीन बोल्ड केलं. तोपर्यंत मैदानावर बरंच दव आलं होतं. तर बुमराहने १३व्या षटकात अक्षर पटेलला झेलबाद केलं. इतक्यात डगआऊटमधून हालचाल दिसली.मुंबई इंडियन्सचा संघ १४व्या षटकानंतर नवा चेंडू घेत होता. आयपीएलमधील नव्या नियमानुसार दुसऱ्या डावात गोलंदाजी करताना जर दव असेल तर गोलंदाजी करणारा संघ नवीन चेंडू घेऊ शकतो. मुंबईने या नियमाचा वापर केला. तितक्यात रोहित शर्माने डगआऊटमधून इशारा केला की दोन्ही बाजूंनी फिरकीपटूला गोलंदाजी द्या. रोहितने संघाचे गोलंदाजी प्रशिक्षक पारस म्हांब्रे यांच्याबरोबर या निर्णयाची चर्चा केली आणि नंतर कोचला देखील माहिती दिली. मैदानावर हार्दिकनेही रोहित आणि कोचच्या या निर्णयाची लगेच अंमलबजावणी केली आणि कर्ण शर्माला चेंडू दिला. त्याने तिसऱ्या चेंडूवर ट्रिस्टन स्टब्सला नमन धीरकरवी झेलबाद केलं आणि षटकात फक्त ६ धावा दिल्या. तर १५वं षटक मिचेल सँटनरने टाकलं त्याने या षटकात ७ धावा दिल्या. पुन्हा पुढील १६वं षटक कर्ण शर्माने टाकलं ज्याने या षटकातील तिसऱ्या चेंडूवर केएल राहुलला बाद करत दिल्लीला मोठा धक्का दिला आणि मुंबईसाठी मोठी विकेट मिळवली. या तीन षटकांमध्ये सामना पालटला.

पण मुंबईच्या विजयाचा नेमका टर्निंग पॉईंट काय ठरला? जाणून घेऊया.२०२५ च्या आयपीएलमध्ये आतापर्यंत दिल्लीचा संघ विजयाच्या रथावर स्वार होता. या सामन्यातही दिल्लीचा संघ विजयाच्या उंबरठ्यावर होता, पण शेवटी संघाने ६४ धावांच्या आत ९ विकेट गमावल्या, ज्यामध्ये सलग तीन खेळाडू धावबाद होण्याचा चमत्कार पाहायला मिळाला. एवढंच नाही तर एक फलंदाज स्टंपिंगवरही बाद झाला. दिल्लीकडून करुण नायरने ८९ धावांची खेळी केली, पण दुर्दैवाने त्याची मेहनत वाया गेली. कर्ण शर्माला आज या सामन्यात इम्पॅक्ट प्लेअर म्हणून खेळण्याची संधी मिळाली आणि त्याने संधीचं सोन करत मुंबईसाठी विजयाची कहाणी लिहिली. कर्ण शर्माने अभिषेक पोरेलला झेलबाद करत पहिली विकेट मिळवली. यानंतर पुढच्या षटकात सँटनरने करूण नायरला क्लीन बोल्ड केलं. तोपर्यंत मैदानावर बरंच दव आलं होतं. तर बुमराहने १३व्या षटकात अक्षर पटेलला झेलबाद केलं.

# करूण नायरचं IPLमध्ये दणक्यात पुनरागमन

## वादळी खेळी करत मुंबईला दिला धक्का; बुमराहची केली धुलाई

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**करूण नायर हे नाव देशांतर्गत क्रिकेटमध्ये गेल्या बऱ्याच काळापासून गाजत आहे. पण आता करूण नायरने आयपीएलमध्ये पुनरागमनाचा डंका वाजवला आहे. करूण नायरला दिल्ली कॅपिटल्स संघाने आयपीएल २०२५ साठी आपल्या ताफ्यात सामील केलं. करूणला सुरूवातीचे सामने खेळण्याची संधी मिळाली नाही. पण संधी मिळताच मात्र त्याने या संधीचं सोनं केलंय. करूण नायरने २२ चेंडूत शानदार अर्धशतक झळकावलं.**



### 22 चेंडूत शानदार अर्धशतक

वनडेत ताकद दाखवून झाल्यावर सय्यद मुश्ताक अली टी२० स्पर्धेतही करुणची बॅट तळपली. ६ डावात २५५ धावा. १७७.०८चा स्ट्राईक रेट. पहिल्या चेंडूपासून फटकेबाजी करावी लागणाऱ्या फॉरमॅटमध्येही करुणचाच जोर. यात तीन अर्धशतकं.करूण नायरला दिल्ली कॅपिटल्स संघाने आयपीएल २०२५ साठी आपल्या ताफ्यात सामील केलं.

करूण नायरने जसप्रीत बुमराहच्या षटकात त्याची धुलाई करत अंदाधुंद फटकेबाजी केली. करूण नायरने उत्कृष्ट क्रिकेट खेळत आपल्या फलंदाजीने सर्वांनाच चकित केलं. बुमराहच्या स्पेलमधील पहिल्याच षटकात त्याने दोन चौकार लगावले. तर त्याच्या स्पेलमधील दुसऱ्या षटकात करूण नायरने चौकार षटकारांचा पाऊस पाडला. या षटकात त्याने दोन षटकार आणि एक चौकार लगावत २२ चेंडूत आपलं अर्धशतक पूर्ण केलं.बुमराहच्या षटकात वादळी फटकेबाजी केल्यानंतर करूण नायरने कोणत्याच गोलंदाजाला सोडलं नाही. पण अखेरीस मिचेल सँटनरने एक उत्कृष्ट चेंडू टाकत त्याला ८९ धावांवर क्लीन बोल्ड केलं. करूण नायर ४० चेंडूत १२ चौकार आणि ५ षटकारांसह ८९ धावा करत बाद झाला. पण संघाच्या विजयाच्या आशा मात्र पल्लवित करत माघारी परतला. देशांतर्गत क्रिकेटमध्ये दशकभर कर्नाटकसाठी खेळल्यानंतर संघातून बाजूला केलं जातंय हे करुणच्या लक्षात आलं. त्यानंतर तो विदर्भ संघात सामील झाला. विदर्भचा पोट्टा झाल्यापासून करुण नायरला अक्षरक्ष: वेड लागलंय. त्याने धावांची फॅक्टरीच उघडलेय. भारतीय संघाचा दरवाजा किलकिला नव्हे तोडल्याशिवाय भाई ऐकत नाही अशी स्थिती. विजय हजारे चषक स्पर्धेत करुणने ९ सामन्यात ७७९ धावा चोपल्या. सरासरी भरली ३८९.५० अशी अबब. स्ट्राईकरेट म्हणजे तुडवण्याचा दर १२४.०४ एवढा तगडा. प्रतिस्पर्ध्यांची खांडोळी करताना नावावर ५ शतकं. करुणच्या या अविश्वसनीय आकडेवारीच्या बळावर विदर्भने स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. अंतिम फेरीत करुणचं माहेर कर्नाटकनेच विदर्भला नमवलं पण करुणच्या तडाखेबंद खेळाने अनेक विक्रम मोडीत निघाले.

स्मार्ट PCMC

# महाईन्यूज™

ePaper

। सोमवार ।

। दि. 14 एप्रिल 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## जीवनात अनेक अडचणी, समस्या येतात

# समस्येकडे संधी म्हणून पहा:डॉ. राजेंद्रकुमार शर्मा

### शिक्षण विश्व: पीसीसीओईआर मध्ये ‘टेक्नोव्हेट 2025’ महोत्सव उत्साहात

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जीवनात अनेक अडचणी, समस्या येतात. परंतु त्याकडे सकारात्मकपणे पाहिले तर नवीन संधी दिसते. या संधीतून नवनवीन संकल्पना उदयास येत असतात त्यांचे वास्तवात रूपांतर करून त्या आत्मसात करा आणि त्याचा समाजाला उपयोग झाला पाहिजे असे मार्गदर्शन डॉ. राजेंद्रकुमार शर्मा यांनी केले.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) येथे ‘टेक्नोव्हेट २०२५’ या तांत्रिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन डॉ. राजेंद्रकुमार शर्मा आणि संगीता शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये विविध तांत्रिक व सर्जनशील प्रकल्प सादर करत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ब्रो कोड, एरर ४०४, ब्रिजिंग माईंड्स, कॅड ओ क्रिएट, इलेक्ट्रोथॉन या नाविन्यपूर्ण व रोचक स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी या सर्व स्पर्धांमध्ये तंत्रज्ञान, सर्जनशीलता आणि टीमवर्कद्वारे आपली कौशल्ये सादर केली.स्वागत प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, प्रास्ताविक डॉ. शिवगंगा गव्हाणे आणि आभार प्रा. प्रीती राजपूत यांनी मानले. विद्यार्थी समन्वयक वैभवी लाटे, प्रज्ञा पानसरे, कौस्तुभ पाटील आणि आराध्या मिनाजगी यांनी आयोजनात सहभाग घेतला.पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



CERTIFICATION COURSE BY MORAYA SHIKSHAN SANSTHA, CHINCHWAD



शिक्षणाबरोबरच सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व घडविणारी शाळा

2025-26 ADMISSIONS OPEN

प्रज्वलितो ज्ञानमयो प्रदीपः

"यत् भावो – तत् भवति"

मोरया शिक्षण संस्था, चिंचवड
डिप्लोमा इन मॉन्टेसरी आणि नर्सरी शिक्षक प्रशिक्षण









* राष्ट्रीय स्तरावर वैध प्रमाणपत्र
* प्रात्यक्षिकवर भर,
* ग्रंथालय सुविधा
* अध्यापन शास्त्राबद्दलची माहिति
* बाल मानसशास्त्र व पोषण आणि खूप काही..

* शुल्क: १६,०००/- (२ हप्त्यांसह)
* १ सेमिस्टर कोर्स
* अभ्यासक्रम कालावधी: १५ जून २०२५ ते १५ डिसेंबर २०२५
* वेळ : सकाळी १० ते दुपारी २

प्लॉट क्र. 13, मोरया कॉलनी, सुदर्शन नगर, गोलांडे राम मंदिरासमोर, चिंचवड, पुणे 33

संपर्क
सुचित्रा आपटे - ९३२५१३२४०२
भाग्यश्री पंडित - ८०८७७०६१००

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

# 2025-26 ADMISSIONS OPEN

## PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI

**42** YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

**50** FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now

86687 55826

98232 31705

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


PROUD PARENTS.
OUR BIGGEST
PRIDE.
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum, Aligned with NEP & NCF
Ambitious Projects like 'Read-to-Lead'
Legacy of 100% Results
Gayatri English Medium School & Jr. College
95277 64646 / 77967 67292
BRANCHES AT: CHARHOLI | MOSHI | DHANORE
BLOSSOM YOUR KNOWLEDGE

KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)



**BBA**

**Bachelor of Business Administration**



**BCA**

**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com